# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना कमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)


## महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग

**Email :** developmentcellgug@gmail.com
development.section@unigug.ac.in


जा. क्र/म.वि.वि.वि./ 3475/२०२२ दिनांक:०३/१०/२०२२

## *परिपत्रक*

**विषय** :— **मोडीलिपी प्रशिक्षण वर्गाबाबत.**

**संदर्भ** :— प्राचार्य, सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर यांचे दि. २०/०९/२०२२ रोजीचे पत्र.

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर जि.चंद्रपूर येथे दिनांक ०६ ऑक्टोंबर, २०२२ ते १५ ऑक्टोंबर, २०२२ या कालावधी मध्ये **मोडीलिपी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात येत आहे.** तरी आपल्या महाविद्यालयातील इतिहास विषयाचे प्राध्यापक व विद्यार्थ्यांना सदर प्रशिक्षण वर्गामध्ये सहभागी होण्यासाठी संदर्भीय पत्राचे अवलोकन करून आपल्या स्तरावरून अवगत करावे.

**सहपत्र**:— **संदर्भीय पत्र.**

मा.प्र—कुलगुरू महोदय यांचे मान्यतेने,

03/10/22

(देवेंद्र एम. झाडे)
**सहाय्यक कुलसचिव**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रति,**

**मा.प्राचार्य,**
**सर्व संलग्नित महाविद्यालये,**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

**प्रत माहितीस्तव** :—

१) मा. कुलगुरू महोदयांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२) मा. प्र—कुलगुरु, यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३) मा. कुलसचिव, यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

सर्वोदय शिक्षण मंडळ संचालित

# सरदार पटेल महाविद्यालय

गंज वार्ड, चंद्रपूर – ४४२ ४०२ (महाराष्ट्र)

(गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली संलग्नीत व ए.आय.सी.टी.ई. नवी दिल्लीची मान्यता प्राप्त)

नॅक बेंगलोर द्वारा 'A' ग्रेड प्राप्त (CGPA-3.05)

प्राचार्य
डॉ. पी. एम. काटकर
एम.पी.एड्., सेट, पीएच.डी.

कार्यालय : ०७१७२-२५५७७८
फॅक्स : ०७१७२-२५६५३७
मोबाईल : ९४२२९०६२८९
Email : pramodkatkar1968@gmail.com

कला/वाणिज्य/विज्ञान/संगणक/गृहविज्ञान/जनसंवाद/ग्रंथालय व माहितीशास्त्र – सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम व आचार्य पदवी संशोधन केंद्र

पत्र क्रमांक : SPM/2231/2022 दिनांक : 20/09/2022

प्रति,
मा. कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ,
गडचिरोली

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
आवक/जावक विभाग
आवक 4674 दि 27/9/22
जावक 4674 दि. 27/9/22

विषय - मोडीलिपी प्रशिक्षण वर्गाची माहिती विद्यापीठाच्या साईटवर प्रदर्शित करणेबाबत

महोदय,

पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासनाच्या वतीने आमच्या महाविद्यालयात **मोडीलिपी प्रशिक्षण वर्गाचे** आयोजन **६ ऑक्टोबर २०२२ ते १५ ऑक्टोबर २०२२** या कालावधीत करण्यात येत आहे. मराठ्यांचा गौरवशाली इतिहास मोडीलिपी मध्ये लिहल्या गेलेला आहे. त्यांचे अनेक दस्तएवज अजून अप्रकाशित आहे. महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात हा इतिहास दडलेला असून तो वाचता यावा तसेच अनेक शासकीय कागदपत्राचा उपयोग करून संशोधकांना मदत व्हावी या उद्देशाने शासनाने हा उपक्रम सुरु केलेला आहे. तरी विद्यापीठ परीक्षेत्रातील इतिहास विषयाच्या प्राध्यापक व विद्यार्थांना **मोडीलिपी** प्रशिक्षण वर्गात सहभाग घेता यावा म्हणून या मोडीलिपी प्रशिक्षण वर्गाची माहिती विद्यापीठाच्या साईटवर प्रदर्शित करण्यात यावी हि नम्र विनंती.

सहकार्याच्या अपेक्षेत.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग
आवक क्र. 3862 दिनांक 28/09/22
जावक क्र.............. दिनांक..............

डॉ.पी.एम.काटकर
प्राचार्य

प्राचार्य
सरदार पटेल महाविद्यालय
चंद्रपूर

श्री राऊत
कार्यवाही व्हावी
28/9/22

# पुराभिलेख संचालनालय
## महाराष्ट्र शासन
( पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग )

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दूरध्वनी - कार्यालय- २२८४३९७१, २२८४४२६८, १५६, सर कावसजी जहांगीर रेडीमनी इमारत, महात्मा गांधी मार्ग, काळा घोडा, फोर्ट, मुंबई-४०००३२
Email : mumbaiarchives@gmail.com


जा. क्र. पुरा.संचा./संकलन/मोलिप्रव/५०२२/बी-९२२४ दिनांक :- 10 MAY 2022

प्रति,
प्राचार्य,
सरदार पटेल महाविद्यालय,
चंद्रपूर
४४२ ४०२.

838/2022
17/08/22

विषय :- मोडीलिपी प्रशिक्षण वर्गाबाबत.
संदर्भ :- आपले पत्र क्र. एसपीएम/८७३/२०२२, दिनांक ०२/०५/२०२२.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रानुसार आपण आपल्या महाविद्यालयात मोडीलिपी प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्याबाबत विनंती करण्यात आली आहे.

त्या अनुषंगाने सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात आपल्या महाविद्यालयात दिनांक ०६.१०.२०२२ ते १५.१०.२०२२ या कालावधीत मोडीलिपी प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात येत आहे. तसेच, शासनाने कोविड-१९ च्या संदर्भात वेळोवेळी दिलेल्या सुचनाचे पालन करुन प्रशिक्षणार्थ्यांना प्रवेश देण्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील. सोबत, मोडीलिपी प्रशिक्षण वर्गाच्या प्रवेश अर्जाच्या ५० प्रती पाठविण्यात येत आहेत. मोडीलिपी प्रशिक्षण वर्गात भाग घेऊ इच्छिणा-या प्रशिक्षणार्थ्यांकडून प्रवेश अर्जासोबत **दोन फोटो, छायांकित ओळखपत्र** व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण शुल्क रु. ३००/- व इतरांकडून प्रशिक्षण शुल्क रु. ६००/- स्विकारुन त्याची प्रवेश अर्जाशी सलग्न कच्ची पावती देण्यासाठी आपल्या कार्यालयातील एका कर्मचा-याची नेमणूक करावी, अशी विनंती आहे. आपल्याकडे जमा असलेले प्रवेश शुल्क दिनांक ०६.१०.२०२२ रोजी या संचालनालयाच्या रोखपालाकडे देऊन त्याच्या शासकीय पावत्या तयार करुन त्या प्रशिक्षणार्थ्यांना वर्ग सुरु झाल्यानंतर देण्यात येतील. आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद.

Recd. 13/5/2022
डॉ. प्रकाश शेंडे 17/5/22

संचालक
पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन

# पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन,
## मोडी लिपी प्रशिक्षण वर्ग
## प्रवेश अर्ज.

प्रशिक्षण केंद्र ____________________ वर्ष- २०-----------

फोटो स्टॅपल करा

१. नाव (ठळक अक्षरात) ____________________

२. निवासस्थानाचा पत्ताः- ____________________

पत्ता सुवाच्च अक्षरात लिहावा ____________________

३. कार्यालयाचा पत्ताः- ____________________

____________________

फोटो चिटकवा

४. शिक्षणः- ____________________

५. जन्म दिनांक :- ____________________

६. दूरध्वनी क्रमांकः- ____________________

प्रशिक्षणाचे नियम व अटी मला मान्य आहेत. सोबत रुपये ३००/- / रुपये ६००/- प्रशिक्षण शुल्क भरत आहेत. कृपया, मला प्रशिक्षण वर्गात प्रवेश मिळावा, ही विनंती.

प्रशिक्षणार्थींची सही

---

नियम व अटी

१ मोडी लिपी प्रशिक्षण दररोज सायंकाळी ४.०० ते ६.०० या वेळेत आयोजित करण्यात येईल.

२ प्रशिक्षण वर्गासाठी विद्यार्थ्यांसाठी प्रवेश फी रु. ५०/- व शिक्षण शुल्क रु. २५०/- याप्रमाणे एकूण रुपये ३००/- व इतरांसाठी प्रवेश फी रु. १००/- व शिक्षण शुल्क रु. ५००/- याप्रमाणे एकूण रुपये ६००/- इतकी आकारले जाईल. परंतु, प्रवेश रद्द केल्यास प्रशिक्षण शुल्क परत मिळणार नाही.

३ प्रशिक्षण पूर्ण करणा-या प्रशिक्षणार्थ्यांची १०० गुणाची परीक्षा घेतली जाईल. ५० गुण मिळविणा-या प्रशिक्षणार्थीना उत्तीर्ण घोषित करुन पुराभिलेख संचालनालयातर्फे प्रमाणपत्र देण्यात येईल. प्रशिक्षण वर्गातील उपस्थिती ८० टक्के पेक्षा कमी असल्यास परीक्षेस बसू दिले जाणार नाही.

४ मोडी लिपी प्रशिक्षण वर्ग संपल्यानंतर कार्यालयाने ठरवून दिलेल्या तारखेनुसारच परीक्षा होईल त्या तारखेत कोणताही बदल करता येणार नाही.

५ परीक्षेस गैरहजर राहिल्यास प्रशिक्षणार्थीस अनुत्तीर्ण समजण्यात येईल आणि त्यांना पुन्हा परीक्षा द्यावयाची असल्यास त्यांनी पुन्हा प्रशिक्षण शुल्क भरुन पुढील सत्र जेथे असेल तेथे प्रवेश घेणे अनिवार्य राहील. मात्र मागीलप्रमाणे त्याची उपस्थिती ८० टक्के असावयास हवी.

६ मोडी लिपी प्रशिक्षण वर्गासंबधी सर्व अधिकार संचालक, पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्याकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

प्रशिक्षणार्थींची सही

---

कार्यालयीन उपयोगासाठी

---------------- येथे दिनांक ------------------ ते -------------------- या कालावधीत होणा-या मोडी लिपी प्रशिक्षण वर्गात प्रवेश देण्यात येत आहे.

भरलेली फी रु. --------------- पावती क्रमांक ---------------------------- दिनांक ----------------------------

रोखपाल / लिपिक-टंकलेखक

---

कच्ची पावती (मुख्यालया बाहेरील प्रशिक्षण वर्गासंदर्भात)

श्री/श्रीमती. ____________________ यांज कडून ____________________ येथे दिनांक ____________

**पासून होणा-या मोडी लिपी प्रशिक्षण वर्गाचा प्रवेश अर्ज व प्रशिक्षण शुल्क रु. ________ प्राप्त झाले.**

स्विकारणा-याची सही.

टिप :- प्रशिक्षण वर्ग सुरू झाल्यानंतर वर्गात शिक्षकांकडे सदर कच्ची पावती परत करून पक्की पावती घ्यावी.